**महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान अंतर्गत पहिल्या टप्प्यामधील (प्राथम्य क्र.१) नगरपरिषदांच्या अग्निशमन विभागासाठी पदनिर्मिती करणेबाबत**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**
**शासकीय परिवहन सेवा इमारत**
**३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग,**
**वरळी, मुंबई-४०० ०३०.**

आदेश क्र.नपप्रसं/अग्निशमन पदनिर्मिती/२०११/का.६, दिनांक :- 25 OCT 2011

वाचा :- १) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.अशस १४०७ /३६० /प्र.क्र.२११ /नवि-२०, दि.३१.८.२००९.
२) नगर विकास विभाग पत्र क्र.अशस-२०१० /प्र.क्र.१०६ /नवि-२०, दि.२८.६.२०१०.

**: आदेश :**

राज्य शासनाने महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६, दि.६.१२.२००८ पासून पहिल्या टप्प्यात राज्यातील नागरी भागात व विशेष नियोजन प्राधिकारण क्षेत्रात लागू केला आहे. राज्य शासनाने महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम, २००९ दि.२३.६.२००९ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द केले आहे. या अधिनियम व नियमांतील तरतूदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील अग्निशमन सेवांचे बळकटीकरण व विस्तारीकरणाद्वारे अग्निशमन सेवेतील तूट भरुन काढण्याकरीता व राज्यातील अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्याकरिता विविध आवश्यक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने नगर विकास विभागाने उपरोक्त वाचा क्र.१ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

०२. महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानाअंतर्गत नगरपरिषदांना अग्निशमन केंद्र व अग्निशमन वाहन उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तसेच अग्निशमन विभागासाठी कर्मचारीवर्ग उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश दिले आहेत. तसेच नगर विकास विभागाने उपरोक्त वाचा क्र.२ येथील पत्रान्वये अग्निशमन विभागासाठी प्रशिक्षित उमेदवारांची नियुक्ती करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

०३. त्या अनुषंगाने महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानाच्या पहिल्या टप्प्यामध्ये (प्राथम्य क्र.१) ९२ नगरपरिषदा / नगरपंचायतींचा समावेश आहे. सध्या प्राथम्य क्र.१ मधील ९२ नगरपरिषदांपैकी खालील ८० नगरपरिषदांसाठी शासनाने निधी वितरीत केलेला आहे. सदरच्या सर्व ८० नगरपरिषदांच्या आस्थापनेवर अग्निशमन विभागासाठी आवश्यक कर्मचारीवर्ग मंजूर करणे आवश्यक आहे.

| क्र. | नपाचे नाव | क्र. | नपाचे नाव | क्र. | नपाचे नाव | क्र. | नपाचे नाव | क्र. | नपाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | डहाणू | १७ | आळंदी | ३३ | भोकरदन | ४९ | सिंदखेडराजा | ६५ | कळमनूरी |
| २ | पालघर | १८ | सासवड | ३४ | परतूर | ५० | चांदूररेल्वे | ६६ | कंधार |
| ३ | तळेगांव-दा. | १९ | रहिमतपूर | ३५ | उमरी | ५१ | दारव्हा | ६७ | मेहेकर |
| ४ | सिल्लोड | २० | म्हसवड | ३६ | हदगांव | ५२ | दिग्रस | ६८ | चिखलदरा |
| ५ | मलकापूर (बुलडाणा) | २१ | पांचगणी | ३७ | मुखेड | ५३ | पांढरकवडा | ६९ | खापा |
| ६ | चिखली | २२ | सांगोला | ३८ | निलंगा | ५४ | रिसोड | ७० | मानवत |
| ७ | वरोरा | २३ | मंगळवेढा | ३९ | भूम | ५५ | नरखेड | ७१ | महाबळेश्वर |
| ८ | भद्रावती | २४ | दुधनी | ४० | परांडा | ५६ | कळमेश्वर | ७२ | गंगापूर |
| ९ | मुरुड-जंजिरा | २५ | कुर्डुवाडी | ४१ | मुरुम | ५७ | तिरोडा | ७३ | पुलगाव |
| १० | श्रीवर्धन | २६ | मलकापूर (कोल्हापूर) | ४२ | नळदुर्ग | ५८ | देवळी | ७४ | अचलपूर |
| ११ | माथेरान | २७ | मुरगुड | ४३ | गेवराई | ५९ | सिंदी | ७५ | मोवाड |
| १२ | पेण | २८ | वैजापूर | ४४ | किल्लेधारूर | ६० | देसाईगंज | ७६ | औसा |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | कर्जत | २९ | पैठण | ४५ | जळगांव-जा. | ६१ | नेर-नबाबपूर नपं | ७७ | शेंदूरजना |
| १४ | त्र्यंबक | ३० | कन्नड | ४६ | नांदूरा | ६२ | जव्हार | ७८ | पातूर |
| १५ | भगूर | ३१ | सोनपेठ | ४७ | देउळगांवराजा | ६३ | पाथर्डी | ७९ | बाळापूर |
| १६ | श्रीगोंदा | ३२ | सैलू | ४८ | लोणार | ६४ | पूर्णा | ८० | जामनेर |

०४. सबब, उपरोक्त नगरपरिषदा /नगरपंचायती यांच्या आस्थापनेवर अग्निशमन विभागासाठी खालील प्रमाणे वर्ग-३ ची २ व वर्ग-४ ची ४ स्थायी पदे निर्माण करण्यास या आदेशान्वये मंजुरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | स्थायी | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक | १ | ४५००-७००० |
| २ | ड्रायव्हर कम ऑपरेटर | १ | ३०५०-४५९० |
| ३ | फायरमन | ४ | २७५०-४४०० |
| | एकूण | ६ | |

०५. उपरोक्त परिच्छेद ०४ च्या अनुषंगाने संबंधित नगरपरिषदेच्या मंजूर आकृतीबंध आदेशातील अटी व शर्ती पूर्वीप्रमाणेच लागू राहतील. तसेच त्यासोबतचे परिशिष्ट "अ", "ब" व "क" देखिल कायम राहतील. अग्निशमन विभागासाठी पूरक परिशिष्ट "क" सोबत जोडले आहे.

(राजीव जाधव) २५/१०/११
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति,

१) प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
२) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन (सर्व)
३) जिल्हाधिकारी (सर्व)
४) उपमुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
५) मुख्याधिकारी (उपरोक्त नगरपरिषदा).

महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान अंतर्गत पहिल्या टप्प्यामधील (प्राथम्य क्र.१) नगरपरिषदांच्या अग्निशमन विभागासाठी पदनिर्मिती करणेबाबत
या संचालनालयाचे आदेश क्र.नपप्रसं/अग्निशमन पदनिर्मिती/२०११/का.६, दिनांक : 25 OCT 2011

## पूरक परिशिष्ट क

परिशिष्ट अ मधील अग्निशमन विभागातील पदांच्या सेवाशर्ती

| अ.क्र. | सांकेतांक | संवर्ग | पदनाम | गट क्रमांक / वेतनश्रेणी | किमान शैक्षणिक अर्हता | | भरती पध्दत | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सरळ-सेवेसाठी | पदोन्नतीसाठी | सरळसेवा/ अंतर्गत भरती | पदोन्नतीसाठी |
| १ | २ | ३ | ४ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | FIR-३ (II) | अग्निशमन अधिकारी श्रेणी-क (द्वितीय) | सहायक अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक | क ४५००-७००० | शासनमान्य विद्यापीठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर. राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर येथील स्थानक अधिकारी व प्रशिक्षक कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र. (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>नगरपरिषद लिडिंग फायरमन पदावरील किमान पाच वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.<br>या संचालनालयाने विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. अशी विभागीय परीक्षा विहित केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे LGS प्रमाणपत्र असणे आवश्यक. | लागू नाही | १००% | लागू नाही |

| अ.क्र. | सांकेतांक | संवर्ग | पदनाम | गट क्रमांक / वेतनश्रेणी | किमान शैक्षणिक अर्हता | | भरती पध्दत | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सरळसेवेसाठी | पदोन्नती साठी | सरळसेवा/ अंतर्गत भरती | पदोन्नती साठी |
| १ | २ | ३ | ४ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| २ | FIR-७ | ड्रायव्हर कम ऑपरेटर | ड्रायव्हर कम ऑपरेटर | क ३०५०-४५९० | **सरळसेवेसाठी-** किमान माध्यमिक शालांत परीक्षा (एसएससी) उत्तीर्ण व शासनमान्य संस्थेकडून फायरमनचे प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक.<br>जड वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक.<br>**शारीरिक पात्रता (किमान) :**<br>१) उंची - १६५ सें.मी.<br>२) छाती - ८१ सें.मी. न फुगवता व फुगवून ८६ सें.मी.<br>३) वजन - ५० किलो<br>४) दृष्टी - चष्म्याशिवाय ५/५<br>**न.प.कर्मचाऱ्यांसाठी -** किमान सातवी उत्तीर्ण व शासनमान्य संस्थेकडून फायरमनचे प्रशि[illegible] पूर्ण असणे आवश्यक.<br>जड वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक.<br>वयोमर्यादा : ४५ वर्षांपेक्षा कमी<br>**शारीरिक पात्रता (किमान) :**<br>१) उंची - १६५ सें.मी.<br>२) छाती - ८१ सें.मी. न फुगवता व फुगवून ८६ सें.मी.<br>३) वजन - ५० किलो<br>४) दृष्टी - चष्म्यासह ६/६ किंवा चष्म्याशिवाय ५/५<br>**वरील दोन्हींसाठी** : दर ५ वर्षांनी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांनी विहीत केलेला उजळणी पाठयक्रम /प्रशिक्षण (Refresher Course) पूर्ण करणे बंधनकारक. | लागू नाही. | न.प. कर्मचाऱ्यांना प्राधान्य. न.प. कर्मचारी उपलब्ध नसल्यास सरळसेवेने | लागू नाही. |

टीप : वर नमूद केलेला पाठयक्रम /प्रशिक्षण (Refresher Course) पूर्ण करेपर्यंत वेतनवाढ रोखून धरण्यात येईल.

| अ.क्र. | सांकेतांक | संवर्ग | पदनाम | गट क्रमांक / वेतनश्रेणी | किमान शैक्षणिक अर्हता सरळ-सेवेसाठी | किमान शैक्षणिक अर्हता पदोन्नतीसाठी | भरती पध्दत सरळसेवा/ अंतर्गत भरती | भरती पध्दत पदोन्नती साठी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| ३ | FIR-६ | फायरमन | फायरमन | ड<br>२७५०-४४०० | **सरळसेवेसाठी-** किमान माध्यमिक शालांत परीक्षा (एसएससी) उत्तीर्ण व शासनमान्य संस्थेकडून फायरमनचे प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक.<br>जड वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक.<br>**शारीरिक पात्रता (किमान) :**<br>१) उंची - १६५ सें.मी.<br>२) छाती - ८१ सें.मी. न फुगवता व फुगवून ८६ सें.मी.<br>३) वजन - ५० किलो<br>४) दृष्टी - चष्म्याशिवाय ५/५<br>**न.प.कर्मचाऱ्यांसाठी-** किमान सातवी उत्तीर्ण व शासनमान्य संस्थेकडून फायरमनचे प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक.<br>वयोमर्यादा : ४५ वर्षांपेक्षा कमी<br>**शारीरिक पात्रता (किमान) :**<br>१) उंची - १६५ सें.मी.<br>२) छाती -८१ सें.मी. न फुगवता व फुगवून ८६ सें.मी.<br>३) वजन - ५० किलो<br>४) दृष्टी - चष्म्यासह ६/६ किंवा चष्म्याशिवाय ५/५<br>**वरील दोन्हींसाठी** : दर ५ वर्षांनी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांनी विहीत केलेला उजळणी पाठ्यक्रम /प्रशिक्षण (Refresher Course) पूर्ण करणे बंधनकारक. | लागू नाही. | न.प. कर्मचाऱ्यांना प्राधान्य. न.प. कर्मचारी उपलब्ध नसल्यास सरळसेवेने | लागू नाही. |

टीप : वर नमूद केलेला पाठयक्रम /प्रशिक्षण (Refresher Course) पूर्ण करेपर्यंत वेतनवाढ रोखून धरण्यात येईल.

(राजीव जाधव) २५/१०/११

आयुक्त तथा संचालक

नगरपरिषद प्रशासन संचालनालय